**बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो ११११२/ प्र. क्र.१५४/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. १४ सप्टेंबर, २०१२

**वाचा :** १) शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापायो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु ०७ .दि.१७/३/२०१०
२) मुख्य सचिव कार्यालयाचे कार्यवृत्त दि.२९/८/२०१२

**प्रस्तावना:** संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असणे व योजनेकरीता अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्यापुर्वी गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये यावर्षी अपु-या पावसामुळे दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हागणदारी मुक्त अटीच्या पुर्ततेअभावी या दोन दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमधील प्रगतीपथावरील व प्रस्तावित असलेल्या नविन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीमध्येअडथळा येऊ नये यासाठी हागणदारी मुक्तीची अट काही कालावधीपर्यंत शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** राज्यातील बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये यावर्षी अपु-या पावसामुळे निर्माण झालेली दुष्काळ सदृष्य स्थिती विचारात घेऊन , ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी संदर्भाधीन दि.१७/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरीत करण्यासाठी विहित करण्यात आलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट बीड व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांसाठी दि.३१ मार्च,२०१३ पर्यंत शिथिल करण्यात येत आहे. त्यानंतर प्रचलित धोरणानुसार सदर जिल्ह्यांमधील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट व अनुदान वितरणाची पध्दत कायम राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१२०९१४१३०९१३१८००** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(र.अं.खडसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती,पापु-०७